# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## लक्ष्मी पूजनाची सभा

**दिनांक** : मंगळवार 05 नोव्हेंबर 1991
**स्थळ** : श्री मधुकर संभाजी राणे, काळाचौकी, मुंबई यांचे घर

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री वासुदेव बाबू राणे | 13. श्री प्रभाकर श्रीधर राणे |
| 2. श्री दत्ताराम विष्णु साटम | 14. श्री उदय भगवान राणे |
| 3. श्री साबाजी त्रिंबक राणे | 15. श्री धोंडीराम राणे |
| 4. श्री अविनाश कृष्णाजी राणे | 16. श्री सुरेश रघुनाथ राणे |
| 5. श्री श्रीधर आत्माराम राणे | 17. श्री एकनाथ अनंत राणे |
| 6. श्री रामकृष्ण भगवान राणे | 18. श्री संतोष श्रीधर राणे |
| 7. श्री मधुसूदन श्रीधर राणे | 19. श्री अरूण राघोजी राणे |
| 8. श्री सत्यवान गणपत सावंत | 20. श्री शिवाजी त्रिंबक राणे |
| 9. श्री यशवंत तुकाराम सावंत | 21. श्री हनुमंत हरिश्चंद्र राणे |
| 10. श्री मधुसुदन स राणे | 22. श्री उत्तम वामन राणे |
| 11. श्री रमेश रघुनाथ राणे | |
| 12. श्री दिलीप मधुकर राणे | |

उपरोक्त संस्थेची लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने सभा दिनांक 05 नोव्हेंबर 1991 रोजी संध्याकाळी 5:00 वाजता श्री मधुकर संभाजी राणे, काळाचौकी या ठिकाणी घेण्यात आली. या सभेस 23 सभासद उपस्थित होते.

प्रथम चिटणीसांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर त्या दिवशीच्या कामकाजाची नोटीस वाचून दाखविण्यात आली. सभेसाठी संस्थेचे उपाध्यक्ष श्री रामकृष्ण भगवान राणे यांनी अध्यक्ष म्हणून कामकाजास सूरवात केली.

विषय पत्रिकेप्रमाणे प्रथम लक्ष्मीपुजनाचा कार्यक्रम होता. हे लक्ष्मीपूजन संस्थेचे माजी अध्यक्ष श्री वासुदेव बाबू राणे यांच्या हस्ते व्हावे अशी सूचना श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी मांडली व त्यास श्री श्रीधर आत्माराम राणे यांनी अनुमोदन दिले. 6:20 वाजता श्री चे यथासांग पूजा इत्यादि आटोपल्यावर चिटणीसांनी गेल्या 2 – 3 महिण्यात केलेल्या कामाचा आढावा असलेले परीपत्रक वाटले व त्यानूसार अध्यक्षांनी काही सूचना अथवा सभासदांच्या मार्गदर्शनाची इच्छा प्रकट केली. त्यानुसार परीपत्रकाप्रमाणे सभासदांनी विविध प्रश्न विचारले व त्याचे निरकारण चिटणीसांनी केले व सूचना देखील स्विकारल्या.

1) सूचना – संस्थेचे वार्षिक हिशेबाचा काळ पूर्वी जानेवारी ते डिसेंबर असा होता तो पुढील काळासाठी एप्रिल ते मार्च असा करावा.
2) विहीरीच्या कामकाजाबद्दल लघुपाटबंधारे विभाग कणकवली यांना स्मरणपत्रे पाठविणे तसेच शाखाप्रमुख / ग्रामपंचायत यांच्याशी पत्रव्यवहार करणे हे एकमताने ठरले.

3) लाईट (रस्त्यावर) पुन्हा एकदा पत्रव्यवहार करणे इत्यादि बाबींवर चर्चा झाली.

तसेच आपली शाळा ही संस्था / विश्वस्तांच्या नावावर असून या शाळेस रिपेअरिंगसाठी पैसा मिळत नाही. त्याबाबत शिक्षणाधिकारी कणकवली यांच्याशी पत्रव्यवहार करण्याचे ठरले. कारण गावातील ही शाळा (इमारत) जिल्हापरिषद कणकवली यांच्याकडे सूपूर्द करावी अश्या तऱ्हेचा ठराव ग्रामस्थांनी पूर्वीच 12 डिसेंबर 1988 रोजी केलेला आहे अशी माहिती चिटणीसांनी सभाग्रहास दिली व त्या तऱ्हेचा ठराव देखील आहे तो वाचून दाखविण्यात आला.

विहीरीबाबत चिटणीसांनी अधिक माहीती दिल्यानंतर विहीर कोणत्याही परिस्थितीत व्हावी व जिद्दीने सर्वांनी पाठींबा दिला.

यानंतर सभासद वर्गणी / स्नेहसंमेलन वर्गणी जमा झाली रु. ______ हे खजिनदार श्री उदय राणे यांनी सांगितले. तसेचे संस्थेचे पूर्वीचे अकाऊंन्ट युनायटेड वेर्स्टन बँक, परेल वरुन ते शालीनी सहकारी बँक, डिलाईल रोड या ठिकाणी बदलण्यात आले अशी माहीती दिली.

स्नेहसंमेलन – स्नेहसंमेलनाची वर्गणी जवळ जवळ 56 सदस्यांची संस्थेकडे जमा करण्यात आली व बाकी असलेली वर्गणी लवकरात लवकर वसुल करण्याचे प्रयत्न आहेत असे अध्यक्षांनी सांगितले व त्यासाठी चांगला प्रतिसाद मिळत आहे व हे संमेलन डिसेंबर 1991 पर्यंत घेण्याचे प्रयत्न आहेत असेही सांगितले. या प्रसंगी एक सोव्हीनियर काढण्याचे ठरले. त्यासाठी सभासदांनी जाहीराती मिळवून देण्याचे प्रयत्न करावे असेही आवाहन करण्यात आले.

दुसरी सूचना अश्या तऱ्हेची होती की  संस्थेच्या मदतीकरता एक चांगले दमदार नाटकाचा प्रयोग सादर करावा व त्यातून जे काही पैसा उरेल तो संस्थेच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी वापरावा अशी सूचना श्री सत्यवान सावंत यांनी मांडली. अध्यक्षांनी असे सांगितले की सूचना चांगली व स्वागतार्ह आहे परंतू सध्या सोव्हिनियर मधून काय मदत मिळू शकते ते बघू व त्यानंतर या सूचनेचा जरूर विचार करू असे सांगितले.

श्री साबाजी राणे यांनी डॉ आंबेडकर यांचा फोटो शाळेस देणगी देणार असे सांगितले त्याचे सर्वांनी स्वागत केले. तसेचे श्री के जी के मेनन अध्यक्ष  एसिक युनियन व सौ मिनाक्षी अय्यर यांनी दिलेली रु.51/- व रु.50/- वर्गणी संस्थेने स्विकारली.

शाळेच्या नावाचा बोर्ड पाहीजे त्यासाठी जवळ-जवळ रु.300/- खर्च आहे तरी ज्या सभासदांना तो देणगी म्हणून द्यावयाचा आहे तो त्यांनी द्यावा. या बोर्डवर अमूक व्यक्तीच्या सौजन्याने असे लिहीण्यात येईल.

तसेच शाळेची जमीन तयार करणे, कंपाऊन्ड तयार करणे या सर्व विषयांवर चर्चा झाली.

श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी संस्थेच्या कार्यकारी मंडळाने थोड्या दिवसांत जी कामाची चूणूक दाखविली त्याबद्दल अभिनंदन केले. तसेच विविध बाकी कामांबद्दल आमदार श्री नारायण तातू राणे यांचेकडे निवेदनासहित भेट घ्यावी असे  ठरले.

यानंतर श्री मधुकर स राणे यांनी लक्ष्मीपूजनासाठी / सभेसाठी जागा उपलब्ध करुन दिल्याबद्दल आभार मानले व या प्रसंगी चहापाणी फराळाची व्यवस्था उत्तमप्रकारे केली त्याबद्दल देखील आभार मानले.

यानंतर उपस्थित सभासदांचे सभेस दिवाळीचा सण असून आर्वजून उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले. तसेच श्री वासूदेव बाबू राणे यांच्या हस्ते लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम पार पडला त्यांचेही आभार मानले. यानंतर पुन्हा एकदा संस्थेस वर्गणी व इतर मार्गदर्शन केल्याबद्दल आभार मानून ही सभा 7:30 वाजता संपली असे अध्यक्षांनी घोषीत केले.

---

| | |
|---|---|
| श्री सुनिल सदानंद राणे | श्री वासूदेव बाबू राणे |
| चिटणीस | सभेचे अध्यक्ष |